RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com



# निशब्द...!
## !! भावपुर्ण श्रध्दांजली !!

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com
अमरावती गुरुवार २९ जानेवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २४४
✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

### सकाळी ११ वा. अंत्यसंस्कार

■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी (दि. २९) सकाळी ११ वाजता विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी सकाळी ९ वाजता त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे.

### पंतप्रधान उपस्थित राहणार

■ अजित पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येतील. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह देशभरातील अनेक प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

### राज्यात तीन दिवसांचा दुखवटा

■ अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्य सरकारने बुधवारी संपूर्ण महाराष्ट्रात तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. २८ ते ३० जानेवारी या कालावधीत शासकीय दुखवटा पाळण्यात येणार आहे.

### घड्याळानेच पटली मृतदेहाची ओळख

■ सर्व मृतदेह अत्यंत जळालेल्या अवस्थेत आढळून आले. अजित मवार यांच्या मृतदेहाची ओळख त्यांच्या मनगटावरील घड्याळामुळे पटली. 'घड्याळ' हेच चिन्ह घेऊन अजित पवारांचा संपूर्ण राजकीय प्रवास झाला आणि त्याच घड्याळाने त्यांच्या मृतदेहाची ओळख पटवणे, हा नियतीचा क्रूर खेळ असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

■ तज्ज्ञ मत

### पायलटची चूक होती की तांत्रिक बिघाड ?

■ अजित पवार यांना घेऊन जाणाऱ्या विमानाचा अपघात नेमका कशामुळे झाला? या घटनेमागे तांत्रिक बिघाड होता की मानवी चूक, याबाबत आता तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

■ 'बंबाडिअर लिअरजेट ४५ एक्सआर या ८ सीटर विमानाला लैंडिंगदरम्यान हा अपघात झाला. विमान लैंड करताना पायलटला दिसणाऱ्या धावपट्टीचा अंदाज घेऊनच विमान उतरवावे लागते. बाहेरून त्यांना मदत देणे शक्य होत नाही. त्यामुळे ही पायलटची चूक होती की, ऐनवेळी तांत्रिक बिघाड झाला, याचा तपास सध्या सुरू आहे.

### विमान ढगांत शिरताच अजित पवारांना वाटायची भीती

■ अजित पवार यांचा विमानातील अनुभवाचा जुना व्हिडीओ व्हायरल झाला. त्यात दादांनी ढगांमध्ये शिरतानाचा किस्सा सांगितला असून, कसं 'पांडुरंगा, पांडुरंगा' धावा सुरू केला व विमान प्रवास सुखरूप झाल्याचे सांगत सुटकेचा निःश्वास सोडला.

### माझ्या पोटात गोळा आला होता, पांडुरंगाचा केला धावा


■ परिस्थिती गंभीर वाटत असल्याने माझ्या मनात भीती होती. माझ्या पोटात गोळा आला होता, तो दिवस एकादशीचा होता. मी मनोमन 'पांडुरंगा, पांडुरंगा' असे म्हणत बसलो होतो, अखेर हा विमानप्रवास सुखरूप पार पडला आणि सर्वजण सुरक्षित पोहोचले."


# 'दादां'ची अकाली एक्झिट!

## हळहळला महाराष्ट्र | बारामतीत विमानाचे लँडिंग होत असताना दुर्घटना; अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू

**विदर्भ केसरी : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार (वय ६६) ज्याच्या राजकारणात अनेकदा धक्कातंत्राचा प्रत्यय देणारे ६६) यांचे बुधवारी सकाळी विमान अपघातात निधन झाले. त्यांची ही अकाली एक्झिटही अवघ्या महाराष्ट्रासाठी धक्कादायक ठरली. वक्तशीर, बोलण्यात कडक पण तितकाच मिश्कील असलेला 'दादा माणूस' अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.**

बुधवारी सकाळी गोजुबावी (ता. बारामती) येथे त्यांचे विमान कोसळले. बारामती विमानतळावर लैंडिंग दरम्यान सकाळी पावणे नऊच्या सुमारास हा अपघात झाला. यात उपमुख्यमंत्री पवार यांच्यासह पीएसओ विदिप जाधव, वैमानिक कॅप्टन सुमित कपूर, फर्स्ट ऑफिसर शांभवी पाठक, फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी यांचाही मृत्यू झाला, बारामतीच्या इतिहासातील बुधवार हा 'काळा दिवस' ठरला. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचार सभांसाठी उपमुख्यमंत्री पवार हे बारामतीत येणार होते. बुधवारी सकाळी मुंबई येथून सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी 'व्हीएसआर व्हेंचर्स' कंपनीच्या 'लिअरजेट ४५' या विमानातून ते बारामतीकडे येत होते. आठ वाजून ५० मिनिटांनी त्यांची बारामती येथील लैंडिंगची वेळ होती. मात्र, तत्पूर्वीच विमानतळावरील धावपट्टीच्या सुरुवातीलाच त्यांचे विमान अपघातग्रस्त झाले. विमान धावपट्टी सोडून बाजूला एका झाडावर जाऊन पडले. याच वेळी विमानाचा स्फोट झाला. यात संपूर्ण विमानाचे तुकडे झाले.





### मे डे कॉल दिला अन् ३ सेकंदांत विमान क्रॅश

■ मुंबई: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच लोकांचा मृत्यू झालेल्या मे. व्हीएसआर कंपनीच्या व्हीटी-एसएसके लेदार जैट ४५ या विमानाचा उत्तरतेवेळी १०० फुटांवर असताना तोल गेला. त्यामुळे ते विमान विमानतळावर कोसळले आणि विमानातील इंधनाचा स्फोट झाला. या अपघातात विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आता पुढे आली आहे. यासंदर्भात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) प्राप्त माहितीनुसार, या विमानाने बुधवारी सकाळी ८ वाजता मुंबईहून बारामतीसाठी उड्डाण केले. त्यानंतर सकाळी ८ वाजून १८ मिनिटांनी पुण्याच्या आसपास असताना वैमानिकाने बारामती विमान वाहतूक नियंत्रण कक्षाशी (एटीसी) संपर्क साधला आणि तेथील वातावरणाच्या स्थितीची विचारणा केली त्यानंतर पुन्हा हे विमान जेव्हा हवेत बारामतीपासून ५५ किलोमीटर अंतरावर असताना त्यांनी पुन्हा बारामती एटीसीशी संपर्क केला असता, त्यांना वारा स्थिर असून, दृश्यमानता ३००० मीटर इतकी असल्याची माहिती देण्यात आली.

### इन्स्ट्रुमेंटल लँडिंग सीस्टम म्हणजे काय ?

■ मुंबई: नियमित विमानप्रवास करणाऱ्या व्यक्तीला शुभेच्छा देताना लोक म्हणतात 'हॅप्पी लडिंग.' त्याचे कारणही तसेच आहे; कारण उड्डाणापेक्षा विमान उत्तस्वणे हे अधिक आव्हानात्मक आहे. त्यामुळेच विमान क्षेत्रामध्ये विमान उत्तरवण्यासाठी सुरक्षेवर अधिक भर देण्यासाठी त्यातील तंत्रज्ञान प्रणाली अधिक अद्ययावत करण्यावर सातत्याने संशोधन सातत्याने सुरू असते. सध्या इन्स्ट्रुमेंटल लैंडिंग सिस्टम (आयएलएस) ही प्रणाली अद्यायावत म्हणून ओळखली जाते. तिला आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण संघटनेचीही मान्यता आहे. आयएनएस प्रणालीचे वैशिष्ट्ा असे की, हवामान कितीही खराब असले किंवा दृश्यमानता कितीही कमी असली तरी या प्रणालीमुळे विमान उतरवणे सुसह्य होते. विमान अत्यंत सुरक्षितरीत्या उत्तरते. परिणामी अपघाताची शक्यता शून्य टक्का इतकी होते.



## दादा परत या...

▸विदर्भ केसरी।

*बारामती मेडिकल कॉलेज परिसरात 'अजितदादा परत या...' या हाकेतून व्यक्त होणारा आवाज, अश्रूंचा बांध फुटलेली जनता आणि स्तब्ध झालेल्या वातावरणाचे दृश्य अंतःकरण पिळवटून टाकणारे होते. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तर अनेकांच्या चेहऱ्यावर विश्वास न बसणारी शांतता दिसत होती.*

*बारामती विमानतळावर उतरत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात आला आणि विमान जमिनीवर कोसळले. या भीषण अपघातात अजित पवार आणि विमानातील इतर चार लोक यांचा अंत झाला. ही मन सुन्न करणारी धक्कादायक बातमी कळताच बारामतीकरांसह राज्यातील नेतेमंडींसह जनसामान्यांनी मेडिकल कॉलेज परिसरात प्रचंड गर्दी केली होती. आपल्या लाडक्या नेत्याचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी लोकांनी मिळेल त्या वाहनाने, काहींनी पायीच, तर काहींनी अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी प्रवास करत बारामती गाठली.*

### व्हीव्हीआयपी विमान आणि मेंटेनन्सचा मुद्दा

■ अपघातग्रस्त विमान हे अतिशय सुरक्षित मानले जाते. या विमानातून अनेकदा अतिमहत्त्वाच्या व्यक्ती प्रवास करत असतात. अशा विमानांची देखभाल संबंधित कंपन्यांकडून अत्यंत काटेकोरपणे केली जाते. शिवाय उपमुख्यमंत्री यातून प्रवास करणार असल्यामुळे त्याची मव्हिसिंग झालेलीच असाठी, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला. देखभालीत त्रुटी असण्याची शक्यता कमी असली, तरी तांत्रिक बिघाड पूर्णपणे नाकारता येत नाही. अपघाताचे खरे कारण अहवालानंतरच समोर येणार आहे.

## अग्रलेख

# 'दादां'ना श्रध्दांजली!

भविष्यात काय होणार ते माणसाला कधीच कळत नाही. राजकारण वाईट आहे, राजकारणात पडू नका, धंदा-पाणी करा, मस्तपैकी राहा असा लोकांना सल्ला देणारे, रोखठोक बोलणारे, मिश्किल स्वभावाचे राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार आज जगात नाहीत यावर विश्वास बसत नाही. जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या निमित्ताने बारामतीकडे निघालेल्या अजित पवारांचा दुर्दैवी विमान अपघातात मृत्यू झाला. ज्या बारामतीतून अजित पवारांनी त्यांच्या राजकारणाची सुरुवात केली, त्याच बारामतीत अजित पवारांचे अकाली निधन होणे हा विचित्र योगायोग म्हणावा लागेल. अत्यंत कार्यक्षम पण वादग्रस्त नेत्याच्या अचानक जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. अत्यंत कार्यक्षम आणि परखड स्वभावाचा नेता म्हणून अजित पवारांची महाराष्ट्राला ओळख होती. त्यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात जरी काका शरद पवार यांच्या छत्रछायेखाली झाली असली तरी त्यांनी लवकरच आपले स्वतंत्र राजकीय कर्तृत्व दाखवण्यास सुरुवात केली. दहावीपर्यंतचेच शिक्षण असूनसुद्धा आपल्या राजकीय बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी राज्यातले अनेक प्रश्न समजून घेतले. मंत्रिमंडळातील अनेक खात्यांचा अभ्यास करून त्या खात्यातील खाचाखोचा व्यवस्थित समजून घेतल्या. त्यामुळे त्यांना प्रशासनावर उत्तम मांड ठोकता आली. मंत्रिमंडळाच्या बैठकीत संपूर्ण तयारी करून येणारा मंत्री अशी त्यांची ख्याती होती. अजित पवार १९९१ मध्ये बारामतीतून खासदार झाले परंतु शरद पवार संरक्षणमंत्री म्हणून केंद्रात गेल्यानंतर त्यांनी त्यांच्यासाठी बारामती लोकसभेची जागा सोडली आणि ते बारामतीतूनच आमदार झाले. सुरुवातीची काही वर्षे ते आमदार होते, नंतर ते सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री झाले. त्यांनी जलसंपदासह वेगवेगळी खाती सांभाळली. विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात ते पहिल्यांदा उपमुख्यमंत्री झाले, त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या कालावधीत विरोधी पक्षनेते पद सोडले तर अजित पवार कायम 'सत्ताधारी' राहिले. नुसते विरोधाचे तात्त्विक राजकारण करून चालणार नाही, समाजसेवा करायची असेल तर सत्ता पाहिजे, सत्तेशिवाय समाजसेवा नाही, हे यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले राजकीय सूत्र शरद पवार यांच्यापेक्षा अजित पवारांनी अधिक पाळले. त्यामुळे त्यांनी तब्बल चार मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्रिपद सांभाळले. विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण आणि देवेंद्र फडणवीस या चार मुख्यमंत्र्यांच्या कार्यकाळात ते उपमुख्यमंत्रिपदावर होते. पृथ्वीराज चव्हाण आणि अजित पवार यांच्यात जलसंपदा या विषयावरून गंभीर मतभेद झाले. जलसंपदा खात्यावर ७० हजार कोटी रुपये खर्च करून सुद्धा १ टक्काच सिंचन होऊ शकले. त्यावेळी अजित पवारांवर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा पहिल्यांदा आरोप झाला. त्या आरोपावरून त्यांची शेवटपर्यंत सुटका झाली नाही. याशिवाय राज्य सहकारी बँकेतील ४५० कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचाही त्यांच्यावर आरोप झाला. या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने अजित पवारांना सत्तेत सामील करून घेतले. त्याबद्दल भाजपवर नेहमीच टीका होत राहिली. देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात अजित पवारांना उपमुख्यमंत्री म्हणून स्थान देण्यात आले. परंतु त्यासाठी अजित पवारांना आपल्या काकांचा राष्ट्रवादी पक्ष फोडावा लागला. प्रारंभी अजित पवार शरद पवारांच्या छत्रछायेखाली असले तरी त्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यास सुरुवात केली. शरद पवारांच्या राजकीय वारसाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा हा वारसा सुप्रिया सुळे यांनाच मिळणार हे लक्षात आल्यानंतर अजित पवार अस्वस्थ झाले आणि त्यांनी स्वतंत्र वाटचाल करण्याचा निर्णय घेतला. पुत्र पार्थ पवारच्या मुंढवा कोरेगाव पार्क जमीन घोटाळा प्रकरणीही अजित पवारांच्या कारकीर्दीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यांची कारकीर्द नेहमीच वादग्रस्त राहिली. अत्यंत कार्यक्षम मंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार वावरले परंतु भ्रष्टाचाराच्या आरोपांनी त्यांची कारकीर्द नेहमीच काळवंडली. विकासकामांसाठी १६-१६ तास काम करणारे नेते अशी त्यांची ओळख होती. एखादी चूक घडली तर त्याबद्दल माफी मागण्याचा मनाचा मोठेपणा त्यांच्याकडे होता. दुष्काळातील पाणीटंचाईबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर त्याबद्दल त्यांनी लगेच माफी मागितली होती. मिश्किल बोलण्यासाठी ते प्रसिद्ध होते. एका सभेत बोलत असताना प्रेक्षकांतून एक जण ओरडला, दोन्ही राष्ट्रवादी एक होणार का? त्यावर क्षणभर थांबत अजित दादा म्हणाले, तुझ्या तोंडात साखर पडो! आता त्यांच्या स्पष्टवक्तेपणाचे एक उदाहरण- तुमच्या दृष्टीने सर्वोत्तम मुख्यमंत्री कोण? या प्रश्नावर अजित पवार क्षणार्धात म्हणाले, विलासराव देशमुख! फडणवीसांच्या मंत्रिमंडळात असताना त्यांनी ही हिम्मत दाखवली! राज्याच्या राजकारणात अजित पवार असे नेते होते की ज्यांच्या घड्याळाच्या काट्यावर प्रशासन धावायचे. त्यांच्या शब्दाला वजन होते आणि 'पहाटेची कामाची वेळ' ही त्यांनी आपली ओळख बनवली होती. भल्या पहाटेच त्यांच्या कामाची सुरुवात व्हायची. बारामतीच्या मातीत झालेला अपघात एका विमानाचा अपघात नव्हता तर तो राज्याच्या राजकारणातील एका धगधगत्या पर्वाचा अकाली अस्त होता. अजित पवार म्हणजे केवळ एक राजकीय नाव नव्हते, तर ती एक कार्यपद्धती होती. स्पष्टवक्तेपणा आणि तडफदार कार्यशैली ही त्यांची दोन प्रमुख शस्त्रे होती. अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# सख्या भावजयीचा खून

## दिरास जिल्हा सत्र न्यायालयाने सुनावली जन्मठेपेची शिक्षा

**▸विदर्भ केसरी। हिंगोली-**

**लहान मुलांच्या भांडणाच्या कारणावरून सख्या भावजयीचा डोक्यात कुऱ्हाडीने घाव घालून निर्घुणपणे खून करणाऱ्या आरोपी दिरास जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ.सरोज एन. माने- गाडेकर यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.**



प्राप्त माहितीनुसार हिंगोली जिल्ह्यातील जोडतळा येथे २२ जुलै २०२० रोजी सविता जाधव शेतात इतर महिलांसोबत सोयाबीन निंदुन झाडाखाली जेवणासाठी बसल्या होत्या. त्यावेळी सविता जाधव यांच्या मागून येऊन त्यांचा दीर माधव उर्फ रामेश्वर समाधान जाधव याने सविता यांच्या डोक्यात कुऱ्हाडीने घाव घातला. तेव्हा सविता तिच्या मांडीवर बसलेल्या लहान मुलालासुद्धा घास भरवत होती. आरोपीच्या हल्ल्याने मुलगा सुद्धा मांडीवरून खाली पडला. आरोपी कुऱ्हाडीने आणखी वार करतच राहिला. त्यावेळी उपस्थित महिला दूर पळाल्या मात्र त्याही मारू नका अशा विनवण्या करित होत्या. सविताच्या दोन लहान मुली सुद्धा तिथेच थांबून 'नाना मारू नका ना, नाना मारू नका ना' म्हणून आकांताने रडत विनवण्या करत होत्या. पण आरोपीने अतिशय निर्दयीपणे कुऱ्हाडीने घाव घालत सविताचा निर्घुण खून केला. याप्रकरणी बासंबा पोलीस ठाण्यात रामकिशोर नंदकिशोर काळबांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी माधव उर्फ रामकृष्ण याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला ताब्यात सुद्धा घेण्यात आले. तत्कालीन पोलीस तपास अधिकारी सपोनि आर. एच .मलपिल्लू यांच्यासह पोलिस अंमलदार बाबाराव धाबे यांनी सखोल तपास करून खुनाचे दोषारोप पत्र हिंगोलीतील जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले. हा खटला जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ. सरोज एन. माने-गाडेकर यांच्या न्यायालयात चालवण्यात आला. दिनांक २७ जानेवारीला अंतिम सुनावणीत जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ. सरोज एन. माने-गाडेकर यांनी आरोपीला दोषी ठरवून खुनाच्या कलम ३०२ भादवीमध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तसेच ५०,००० रुपयाचा दंडही सुनावला. दंड न भरल्यास आणखी एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम मयत सविताच्या तिन्ही मुलांना द्यावी असा आदेशही न्यायालयाने दिला. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनाही मयत सविताच्या मुलांना शिक्षण व पुनर्वसनासाठी व पतीला आर्थिक मोबदला देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले. याप्रकरणी सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील एस.एन. मुटकुळे यांनी एकूण १३ साक्षीदार तपासून अंतिम युक्तिवाद सादर केला. सहाय्यक सरकारी वकील सविता एस.देशमुख(जाधव) यांनी काही साक्षीदार तपासून सहकार्य केले. सहायक सरकारी वकील एस. डी. कुटे यांनीही सहकार्य केले. तसेच या कोर्ट प्रकरणात कोर्ट पैरवी ए. डी. डोईजड यांनीही सहकार्य केले.

# नाल्यात सापडली नवजात बालिका

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा**

शहरातील हनुमान वार्ड परिसरात पहाटेच्या सुमारास नाल्यात टाकून दिलेली नवजात बालिका आढळल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. सुदैवाने स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे बालिकेचा जीव वाचला असून पांढरकवडा पोलिसांनी अवघ्या दोन तासांत तिच्या आई-वडिलांचा शोध घेत त्यांना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केतन गजानन कटकोजवार (वय ३३, रा. हनुमान वार्ड) यांना २८ जानेवारी रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजता त्यांच्या जुन्या घराजवळील नाल्यातून बाळ रडण्याचा आवाज आला. त्यांनी तात्काळ शेजाऱ्यांना बोलावून पाहणी केली असता नाल्यात नवजात स्त्री जातीचे अर्भक आढळून आले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बालिकेला बाहेर काढून तातडीने उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी बालिकेची प्रकृती स्थिर असल्याची माहिती दिली. या प्रकरणी पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे अपराध क्रमांक ११९/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ९३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. नवजात बालिकेच्या पालकांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली. तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी जलद कारवाई करत बालिकेची आई अर्चना सुनील शिवरकर (वय २८) व वडील सुनील दिंगाबर शिवरकर (वय ३१), दोघेही रा. नेहरू वार्ड, पांढरकवडा असल्याचे निष्पन्न केले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर व पोहेकॉ प्रमोद जुनुनकर, विलास जाधव, मपोहेकॉ दुधना मसराम, मपोशी ज्योस्तना तलांडे चालक सहा. फौ. प्रफुल्ल पावसेकर यांनी केला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप नरसाळे व पोलीस कॉन्स्टेबल विशाल वाढई करीत आहेत. या घटनेमुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, मुलींच्या सुरक्षेबाबत आणि समाजातील विकृत मानसिकतेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई

**▸विदर्भ केसरी। कुही**

दिनांक 25-01-2026 रोजी अवैध गौण खनिज वाहतुकीस आळा घालण्यासाठी कुही तालुक्यात गस्त घालत असताना पचखेडी ते मांडळ या रस्त्यावर MH 40 BL 4456 क्रमांकाच्या ट्रक/डंपरला अडवून तपासणी करण्यात आली. ही कारवाई नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे यांच्यामार्फत करण्यात आली.

तपासणीदरम्यान सदर वाहनाने एका रॉयल्टीवर तीन वेळा मुरमाची वाहतूक केल्याचे निष्पन्न झाले. नियमानुसार एका रॉयल्टीवर एकदाच गौण खनिजाची वाहतूक करता येते, मात्र अतिरिक्त दोन फेऱ्या केल्याने ही वाहतूक नियमानुसार अवैध ठरते. या प्रकरणी संबंधित वाहन जप्त करून पुढील कारवाई होईपर्यंत



वेलतूर पोलीस स्टेशन येथे अटकाव करून ठेवण्यात आले आहे. वाहन मालक निर्धन निंबारते (रा. मांडळ) असून वाहन चालक रुपेश मारबते (रा. पचखेडी) असल्याची माहिती आहे. प्रशासनाच्या या ठोस कारवाईमुळे कुही तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीवर अंकुश बसणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# सतर्कतेमुळे मतिमंद तरुणीला मिळाला आधार

## 'नंददीप' संस्थेत केले स्वाधीन

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ**

मोहदा येथे माणुसकीचे दर्शन घडवत पोलीस पाटील पियुष गबराणी यांनी एका मतिमंद व बेवारस महिलेचे प्राण वाचवून तिला सुरक्षित आश्रय मिळवून दिल्याची घटना सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेल्या या कार्यामुळे मोहदा परिसरातसंवेदनशीलतेचा आदर्श निर्माण झाला आहे. मोहदा येथे सुमारे २२ वर्षीय एक मतिमंद महिला रस्त्याने दिशाहीन अवस्थेत फिरताना नागरिकांच्या निदर्शनास आली. तिची अवस्था पाहून काही जागरूक नागरिकांनी याबाबत तात्काळ पोलीस पाटील पियुष गबराणी यांना माहिती दिली. माहिती मिळताच त्यांनी वेळ न दवडता दिनांक २७जानेवारी २०२६रोजी सामाजिक कार्यकर्ते अमीर कडीवार यांच्याशी संपर्क साधून त्या महिलेचा शोध घेण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान सदर महिला आसोली रोड परिसरात फिरत असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलीस पाटील पियुष गबराणी यांनी स्वतःच्या खर्चाने वाहनाची व्यवस्था करून त्या महिलेचा सुरक्षितरीत्या ताबा घेतला. तिच्या सुरक्षिततेचा विचार करून तिला यवतमाळ येथील नंददीप फाउंडेशनकडे सुपूर्द करण्यात आले. नंददीप फाउंडेशनचे संदीप शिंदे यांनी सदर महिलेला स्वीकारून तिच्या उपचार, निवारा व काळजीची जबाबदारी घेतली. ही महिला रस्त्यावर फिरत असल्याने तिच्याबाबत गैरप्रकार घडण्याची किंवा एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता



होती. मात्र पोलीस पाटील पियुष गबराणी यांच्या तत्परतेमुळे आणि माणुसकीच्या दृष्टिकोनामुळे एक अनर्थ टळला. या अगोदरही त्यांनी अनेक बेवारस व मतिमंद महिलांना नंददीप फाउंडेशनमध्ये पोहोचवले असून, रस्त्यावरील अपघातग्रस्तांना दवाखान्यात दाखल करण्यास नेहमी पुढाकार घेतला आहे. पोलीस पाटील हे केवळ प्रशासकीय कामापुरते मर्यादित न राहता समाजहितासाठी झटणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यांच्या या कार्यामुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण होत असून समाजातील दुर्बल घटकांसाठी ते आधारस्तंभ ठरत आहेत. या प्रसंगी नंददीप फाउंडेशनचे संदीप शिंदे, पोलीस पाटील पियुष गबराणी, सामाजिक कार्यकर्ते अमीर कडीवार तसेच इकबाल शेख उपस्थित होते. मोहदा परिसरातील नागरिकांनी पोलीस पाटील यांच्या या सामाजिक कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहेत. माणुसकी, संवेदनशीलता आणि समाजसेवेचा आदर्श घालून देणाऱ्या या घटनेमुळे मोहदा तालुक्यात एक सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

## जि.प.आंतरराष्ट्रीय आदर्श शाळेत (मुले) बक्षीस वितरण!

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



बाळापूर : तालुक्यातील वाडेगाव येथील पी.एम.श्री.भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प. आंतरराष्ट्रीय आदर्श शाळेत (मुले) प्रजासत्ताकदिन सोहळा व बक्षीस वितरण करण्यात आले. सर्वप्रथम शाळेतील स्काऊट गाईड पथकाने लेझीम पथकाच्या गजरात शाळेतील उपस्थित पाहुण्यांना आमंत्रित केले. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक समाधानजी सोर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रजासत्ताक दिनाच्या घोषणा दिल्या. विद्यार्थ्यांनी वर्षभर विविध खेळ व क्रीडा स्पर्धांमध्ये मिळविलेल्या नैपुण्याबद्दल विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित व्हावा याकरिता बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक समाधान सोर होते तर प्रमुख अतिथी म्हणून केंद्र प्रमुख माधवजी काळे शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. भाग्यश्रीताई हिरळकार तसेच सर्व समिती सदस्य,शाळेच्या माजी शिक्षिका सौ. सुनंदा जावरकर,श्री आश्विनभाऊ कंडारकर, निमंत्रित पत्रकार मंडळी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री समाधान सोर सर ह्यांनी केले.सर्व मान्यवरांच्या हस्ते थोर विभूतींचे प्रतिमापूजन करण्यात आले.सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले तसेच शाळेची एकंदर प्रगती बघून समाधान व्यक्त केले. गणतंत्र दिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व माहितीपर भाषणे सादर केली.सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजना व वर्षभर विविध खेळ व क्रीडा स्पर्धांमध्ये मिळविलेल्या नैपुण्याबद्दल गुणगौरव व बक्षीस वितरण करण्यात आले.आदर्श शिक्षक पुरस्कार योजनेअंतर्गत शाळेतील वर्ग 1 ते 5 मधून स.शिक्षिका श्रीमती छाया काळबांडे मॅडम तर पूर्वप्राथमिक वर्गांमधून कु. प्रियंका वाढोकार मॅडम ह्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.सदर कार्यक्रमाला बहुसंख्य पालक उपस्थित होते. सकाळ पाळीतील ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक श्री.सुरेश कातखेडे सर ह्यांनी केले तर बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षीका सौ.प्रिया सोळंके मॅडम ह्यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाची आभार प्रदर्शनाची धुरा शिक्षक श्री.गजानन कातखेडे सर ह्यांनी सांभाळली.सरतेशेवटी विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले.

# मातोश्री पार्वतीबाई नाईक कॉन्व्हेंट, पुसद येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**

पुसद : युवक मंडळ, पुसद यांच्या द्वारा संचालित स्थानिक मातोश्री पार्वतीबाई नाईक कॉन्व्हेंट येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी नगर परिषद, पुसदचे बांधकाम सभापती आदरणीय श्री. अभिजीत पानपट्टे तसेच आदरणीय सौ. संगीताताई वडते मॅडम (संचालिका, एम. पी. एन. कॉन्व्हेन्ट अँड इंग्लिश मिडीयम, पुसद) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री. बी. एन. खराटे उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून



आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदके व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी लहान चिमुकल्यांनी सादर केलेल्या सुंदर सांस्कृतिक नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. तसेच शाळेतील विद्यार्थिनींनी देशभक्तीपर नृत्य सादर करून कार्यक्रमात रंग भरला. लेझीम, घुंगरूकाठी व डंबेल्स यांचे शिस्तबद्ध व शानदार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रिती संदीप पोळकट मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. सचिन तळणकर सर यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव आदरणीय श्री. विजयभाऊ जाधव व संचालिका सौ. संगीताताई वडते यांनी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# रक्तदान शिबिरात १३४ रक्तदात्यांनी केले रक्तदान

## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजन
## नगरसेवक प्रकाश मारोटकर यांचे सातत्याने आठ वर्षापासून यशस्वी आयोजन

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर/अमोल धवसे**

शिवसेनाप्रमुख हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना ठाकरे गटाचे नगरसेवक प्रकाश मारोटकर यांनी नांदगाव शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन करून १३४ रक्तदात्यांनी विक्रमी रक्तदान पार पडले.

हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून गेल्या आठ वर्षापासून सुरू असलेल्या रक्तदानाचा वसा हा अधिक प्रभावीपणे पार पडला गजानन महाराज मंदिरात आयोजित शिबिरामध्ये युवकांनी



व शिवसैनिकांनी उस्फुर्त प्रतिसाद देत शेकडो रक्ताच्या पिशव्यांचे संकलन केले जे रुग्णांसाठी जीवनदायी ठरणार आहे. या रक्तदान शिबिरात सौ. जयश्री सुहागपुरे या महिलेने रक्तदान करून शिबिराला सुरुवात करण्यात आली सदर शिबिरामध्ये पोलीस, तलाठी, वीजवितरण कपंनीचे कर्मचारी, पोस्ट ऑफिस कर्मचारी, तरुण युवकांनी व शिवसैनिक अशा १३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी शिवसेना विधानसभा समन्वयक नगरसेवक प्रकाश मारोटकर, नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर, न.पं.सभापती कांताबाई लोमटे, वासुदेवराव लोखंडे, उपनगराध्यक्ष शेख जमिर, नगरसेवक शेख साजिद, मधुकर कोठाळे, श्रीकृष्ण सोळंके, निलेश इखार, सुनिल गुरमुळे, रेखा नागोलकर, जयश्री सुहागपुरे, शाम मुळे, नितीन दुधे, प्रफुल ठाकरे, शुभम रावेकर,मनोज बनारसे, शेख तन्वीर, आशिष हटवार, अनिकेत गटूले, अक्षय हिवराळे, ऋषिकेश चांदुरकर, पवन शिरभाते, प्रेम हिवराळे, सुमित लोमटे, रवि ठाकूर, गोपाल बनकर, स्नेहल प्रभाते, मनिष भोसले, चेतन धवणे, अक्षय मारोटकर, आदित्य देशमुख, सुमित गुरमुळे, अमन मानकर, सूरज सोळंके, सागर भामुद्रे, सूरज लोमटे, ऋषिकेश गोलाईत, विशाल गुल्हाने, शुभम वाघ, मनोज ढगे, हिमांशू तोटे इत्यादींनी रक्तदान शिबिरा करिता परिश्रम घेतले.

**केवळ उत्सव साजरा न करता समाजसेवेचे ऋण फेडणे हीच खरी बाळासाहेबांना मानवंदना असून रक्तदान हे सर्वात मोठे दान असल्याचे मत शिबिराचे आयोजक नगरसेवक प्रकाश मारोटकर यांनी व्यक्त केले.**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## नागपूरमध्ये हिट अँड रन; चालक फरार, पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्न

नागपूर: एमआयडीसी पोलीस स्टेशन परिसरात अदानी कंपनीच्या काँक्रीट मिक्सर ट्रकने धडक दिल्याने एका ५६ वर्षीय कामगाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी घडली. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पळून गेला, तर कंडक्टरने आपण झोपलो असल्याचे सांगितले. मृत मधुकर नामदेव गोतमारे (५६) हे गेल्या आठ वर्षांपासून दैनिक भास्कर प्रेसमध्ये काम करत होते. ते त्यांच्या हिरो एचएफ डिलक्स (एमएच-४९-बीसी-०५९४) दुचाकीवरून कामावर जात असताना, जयताडा रोडवरील गुडलक सोसायटीजवळ वळण घेत असताना मागून आलेल्या अदानी कंपनीच्या काँक्रीट मिक्सर ट्रकने (एमएच-४९-बीझेड-७१९९) त्यांना चिरडले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, ट्रकचे पुढचे चाक आणि संपूर्ण वाहन त्यांच्या शरीरावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, अपघातग्रस्त ट्रक वाडी येथील अदानी प्लांटमधून काँक्रीट घेऊन जात होता. हे काँक्रीट सरकारी वसतिगृहाच्या बांधकामासाठी नेले जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या वसतिगृहाची जबाबदारी कोणत्या विभागाची आहे, याबाबत स्पष्ट माहिती देण्यास पोलिसांनी टाळाटाळ केली. घटनेवेळी ट्रकमध्ये उपस्थित असलेल्या कंडक्टर राजेश उईके याने पोलिसांना सांगितले की, तो झोपला होता आणि जागा झाल्यावर चालक ट्रकमध्ये नव्हता. त्याने फरार चालकाचे नाव 'आशु' असल्याचे सांगितले असले तरी, त्याची माहिती अस्पष्ट आणि परस्परविरोधी असल्याने संशय निर्माण झाला आहे. अपघातानंतर घटनास्थळी खाजगी बाउन्सर उपस्थित असल्याचे दिसले.

## संक्षिप्त



### श्री. गोविंद विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

मंगरूळपीर : 77 वा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून श्री गोविंद विद्यालय पार्डी ताड येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारचे स्वागत गीत, नृत्य, भारुड, पर्यावरण गीत, ऐतिहासिक गीत, नाटक, देशभक्तीपर गीत, महाराष्ट्रीयन लोककलेवर आधारित नृत्य प्रकार विद्यार्थ्यांनी अत्यंत हावभावयुक्त सादर केले. संस्थेचे सचिव शरद ठाकरे यांच्या नेतृत्वात कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावचे सरपंच परशराम लांभाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, पं. स. सदस्य अतुल गायकवाड तथा तंटामुक्ती अध्यक्ष सचिन लांभाडे, यांच्या हस्ते ध्वजपूजन व महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये छत्रपती संभाजी महाराज, महात्मा गांधी, यांची हुबेहूब व्यक्तिरेखा नाट्यातून साकारण्यात आली. हा सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच मराठी भाषा, इतिहास, विज्ञान, लोकसंस्कृती, पर्यावरणाचा लोकजागर करणारा ठरला. विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या अभिनयाचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक शामराव ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता विद्यालयाचे शिक्षक सदानंद ठाकरे, गोपाल गावंडे, मीना नानुटे, अनेश मस्के, आकाश ठाकरे, महादेव बोरकर, तसेच पालक व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बाळकृष्ण राऊत यांनी तर आभार प्रदर्शन जगदीश गावंडे यांनी केले.




### गावंडगावचे सरपंच सुनील थोरात यांची प्रकृती खालावली; आमरण उपोषणाचा दुसरा दिवस

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रेमदास तायडे

अंजनगाव सुर्जी : तालुक्यातील गावंडगावचे सरपंच सुनील थोरात यांनी रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात 26 जानेवारीपासून आमरण उपोषण सुरू केले असून आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे. सातेगाव मार्गावरील वनुजा बाग–चिंचोली रहिमापूर रस्त्याच्या चौफुलीवर हे उपोषण सुरू असून, रात्रीच्या तीव्र थंडीतही आंदोलन अविरत सुरू आहे. मात्र, उपोषणामुळे सरपंच थोरात यांची प्रकृती खालावत असल्याची माहिती त्यांच्या पत्नींनी दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणारा सातेगाव ते गावंडगाव–हिंगणी–वनुजा बाग–चिंचोली रहिमापूर हा रस्ता अत्यंत खराब झाला असून, या रस्त्यावरून ये-जा करताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार मागणी करूनही रस्त्याच्या दुरुस्तीकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने अखेर सरपंच सुनील थोरात यांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. या उपोषणाला पंचक्रोशीतील पाच गावांमधील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत असून, आंदोलनस्थळी नागरिकांची सतत गर्दी दिसून येत आहे. विशेष म्हणजे, या परिसरातील सहा ग्रामपंचायत सरपंचांनी ठराव मंजूर करून उपोषणाला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा उपोषणकर्त्यांच्या वतीने देण्यात आला आहे. तसेच, महिलांसह नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची तयारी सुरू असल्याचेही सांगण्यात आले. या उपोषणात बाळासाहेब हरणे, प्रशांत रहाटे, महेश खारोडे, राहुल हरणे, गुरुदास वानखडे, नानाभाऊ देशमुख, गजानन देशमुख, विनोद देशमुख, नीरज नागे, राजेश भदे यांच्यासह पंचक्रोशीतील समस्त नागरिक सहभागी असून, प्रशासनाने तातडीने रस्त्याच्या कामास मंजुरी देऊन आंदोलन संपवावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

### मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत पायाभूत सुविधांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्री यांचे निर्देश

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : मुंबई येथे मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या आज झालेल्या बैठकीत गडचिरोली जिल्ह्याच्या दळणवळण व औद्योगिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. समृद्धी महामार्गाच्या विस्ताराअंतर्गत नागपूर– गोंदिया सोबतच भंडारा–गडचिरोली महामार्गाच्या कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या विस्तारामुळे गडचिरोली जिल्ह्याचा राज्यातील प्रमुख आर्थिक केंद्रांशी थेट आणि जलद संपर्क अधिक बळकट होणार आहे. याच बैठकीत गडचिरोली जिल्ह्यातील खनिज वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी नवेगाव- मोरे– कोनसरी – मूलचेरा–हेडरी–सुरजागड या महामार्गाच्या सुधारित ८५.७६ किलोमीटर लांबीस व चारपदरी सिमेंट काँक्रिटकरणास मान्यता देण्यात आली आहे. हा महामार्ग खनिज वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून सुरक्षित, वेगवान आणि सुकर वाहतुकीस चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व पायाभूत प्रकल्पांची कामे ठरावीक कालमर्यादित पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कोणताही प्रकल्प रेंगाळू नये, तसेच काम सुरू करण्यापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या व मंजुरी पूर्ण करूनच अंमलबजावणी करावी, असे त्यांनी सांगितले. समृद्धी महामार्गाचा विस्तार आणि सुरजागड मार्गाच्या चारपदरीकरणामुळे गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, खनिज आधारित उद्योग तसेच एकूणच आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.




# चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात भ्रष्टाचाराचा धुराळा

## मुख्य अभियंत्यांकडून कार्यकारी संचालकांच्या पत्राला 'केराची टोपली'

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : कुणाल गायकवाड

आशिया खंडातील सर्वात मोठे ऊर्जा केंद्र म्हणून ओळख असलेल्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र (CSTPS) सध्या भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांमुळे आणि अंतर्गत वादांमुळे चर्चेत आले आहे.

मुख्य अभियंता विजय राठोड यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून कोट्यवधींचा भ्रष्टाचार केल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे सुनील दहिगावकर यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणाच्या चौकशीसाठी मुंबईतील कार्यकारी संचालकांनी दिलेल्या आदेशाला मुख्य अभियंत्यांनी चक्क केराची टोपली दाखवल्याचे समोर आले आहे.



■ या संदर्भात कार्यकारी संचालक यांना याविषयी विचारणा केल्या असता त्यांनी सांगितले की माझ्याकडे नागपूर आणि मुंबईचा पण पदभार आहे आणि आता मी मुंबईला आहे नागपूरला गेल्यावर अहवाल आला की नाही याची माहिती घेतो.

- पाटील साहेब
कार्यकारी संचालक
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती, कंपनी मर्यादित

### मुख्य मुद्द्यावर एक नजर

■ 1) वरिष्ठाच्या आदेशाचा अवमान : सात दिवसाची मुदत उलटूनही अद्याप चौकशी अहवाल सादर झालेला नसल्याचे कळते 2) नातेवाईक आणि ठेकेदार साखळी : आपल्या खास मर्जीतील ठेकेदारांना कामे देऊन भ्रष्टाचार केल्याचा आरोप 3) कामगारांमध्ये चर्चा : महा औद्योगिक केंद्रातील प्रशासकीय शिस्त ढासळल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराज च्या सूर आहे वरिष्ठाच्या आदेशाचे उल्लंघन करून चौकशी टाळणाऱ्या मुख्य अभियत्त्यावर आता प्रशासन काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाल्यास चंद्रपूर थर्मल पावर स्टेशन मधील भ्रष्टाचाराचे मोठे रॅकेट उघड होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे

### नेमके प्रकरण काय?

■ सुनील दहिगावकर यांनी महानिर्मितीच्या कार्यकारी संचालकांकडे एक तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, मुख्य अभियंता विजय राठोड यांच्या कार्यकाळात चंद्रपूर ऊर्जा केंद्रात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाली आहे. या तक्रारीची गंभीर दखल घेत कार्यकारी संचालकांनी २२ डिसेंबर २०२५ रोजी मुख्य अभियंत्यांना एक पत्र पाठवले होते. या पत्रात नमूद केलेल्या मुद्द्यांची पडताळणी करून सात दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

### नातेवाईकाला वाचवण्याचा प्रयत्न?

■ मिळालेल्या माहितीनुसार, या भ्रष्टाचारात मुख्य अभियंता विजय राठोड यांचे निकटवर्तीय आणि नातलग विकी राठोड यांचा समावेश असल्याचा आरोप होत आहे. आपल्या पुतण्याला आणि काही विशिष्ट ठेकेदारांना वाचवण्यासाठीच विजय राठोड यांनी वरिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या पत्राला उत्तर न देता चौकशी प्रलंबित ठेवल्याची चर्चा औद्योगिक केंद्रात रंगली आहे. ठराविक ठेकेदारांना हाताशी धरून येते कोट्यावधीशी माया जमवण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## जनगाव सुर्जी येथे महावितरणचा सहाय्यक अभियंता एसीबीच्या जाळ्यात

### घरगुती मीटर तपासणीच्या नावाखाली ३५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रेमदास तायडे




अंजनगाव सुर्जी : अमरावती जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेला भ्रष्टाचार आणि महावितरण कंपनीचा जाच यामुळे विद्युत ग्राहक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. ग्राहकांनी केलेल्या तक्रारींकडे वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने शेवटी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (ACB) धाव घेण्याची वेळ येत आहे. अशाच एका तक्रारीतून अंजनगाव सुर्जी येथे महावितरणचे सहाय्यक अभियंता अजय चौधरी हे ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात अडकले. अंजनगाव सुर्जी येथील शरीफनगर परिसरातील एका विद्युत ग्राहकाने तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, सहाय्यक अभियंता अजय चौधरी यांनी फिर्यादीच्या घरी जाऊन घरगुती वीज मीटरची तपासणी केली. मीटरच्या वायरमध्ये छेडछाड झाल्याचा आरोप करत त्यांनी मीटर काढून कार्यालयात नेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी फिर्यादीस महावितरण कार्यालयातील वर्ग–२ कार्यालयात बोलावून ४० हजार रुपयांची लाच मागितली. दीर्घ चर्चेनंतर ३५ हजार रुपये देण्याचे ठरले, मात्र या भ्रष्ट मागणीला कंटाळून फिर्यादीने अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत एसीबीने वरिष्ठ अधिकारी बापू बांगर व सचिन द्र. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सापळा रचला. आज दुपारी सुमारे बारा वाजता महावितरण कार्यालय, अंजनगाव सुर्जी येथे सहाय्यक अभियंता अजय चौधरी हे फिर्यादीकडून ३५ हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली. या कारवाईत तपास अधिकारी श्री. किंनगे साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढील तपास सुरू केला आहे.

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याहस्ते मेडशीचा गौरव

### महविस्तार ए आय मध्ये राज्यातून तृतीय क्रमांक

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विठ्ठल भागवत

पोलीस कवायत मैदान वाशिम येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी राज्याचे कृषिमंत्रीतथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी ध्वजवंदन केले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करतांना ते बोलत होते की आज बळीराजा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व उपयोग करून आपल्या शेतातील पिके,बाजारभाव,हवामान अंदाज व इत्तर गोष्टींचा लाभ महाराष्ट्र शासनाच्या अतिशय महत्त्वकांक्षी शेतकऱ्याकरिता बनविण्यात आलेल्या ए आय महविस्तार ॲपच्या माध्यमातून घेत आहे. जिल्ह्यात आज घडीला हजारो शेतकरी बांधव ॲपचा वापर करून शेती करत आहेत. यामुळे जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय वाशिम यांच्या वतीने जिल्ह्यातील शेतकरी बांधवांकरिता वेगवेगळ्या स्पर्धेच आयोजन करण्यात आले होते. व विजयी उमेदवारांचे सन्मानचित्र प्रशस्ती पत्र देऊन ना कृषी मंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. वाशिम जिल्ह्यात ज्या गावा मध्ये महाविस्तार ए आय ॲप डाऊनलोड जास्त वापर करून शेतीसाठी उपयोग करणाऱ्या गावामध्ये स्पर्धा ठेवण्यात आली.ज्या महाराष्ट्र राज्यातून मेडशी या छोट्याशा गावाने तृतीय क्रमांक पटकावला.त्यामुळे ना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कृषीसहाय्यक डी के रणवीर व मेडशी येथील प्रगतशील शेतकरी अजिंक्य मेडशीकर याना सन्मानित करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर,जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे,मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान,भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा,अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,अपर पोलीस अधिक्षक लता फड,उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा,कृषि उपसंचालक कु हिना शेख यांच्यासह इतर मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



## ग्राम विकास मंत्री गिरीश महाजनांचा वंचित आघाडीने केला जोरदार निषेध

### प्रजासत्ताकदिन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळल्याचा आरोप

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे




गडचिरोली : नाशिक येथिल प्रजासत्ताकदिन समारंभात ग्राम विकास मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी भाषण करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळल्याचा आरोप करून जोरदार निषेध करीत अनुसूचीत जाती - जमाती कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतिने गडचिरोली येथील इंदिरा गांधी चौकातील निषेध आंदोलनातून करण्यात आली. गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक येथील प्रजासत्ताकदिन कार्यक्रमाचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटत असून तमाम फले-शाहू-आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या भावना दु:खावल्या गेल्या आहेत, गिरीश महाजनांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली. प्रजासत्ताक कार्यक्रम स्थळी प्रत्यक्ष गिरीश महाजनांच्या समोरासमोर निषेध व्यक्त करणाऱ्या रणरागिनी माधवी जाधव यांचा यावेळी कौतुक करून पाठींबा जाहिर करण्यात आला.

निषेध आंदोलनात गिरीश महाजन, भाजपा राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या निषेध आंदोलनाचे नेतृत्व नगरसेवक तथा वंचित बहुजन आघाडीचे पूर्व विदर्भ समन्वयक बाळू टेंभुर्णे, जेष्ठ नेत्या वनिता बांबोळे यांनी केले. यावेळी आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रशांत देव्हारे, निरीक्षक जी. के. बारसिंगे, आजाद समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष राज बंसोड, प्रतिक डांगे, गुलाब मडावी, वंचितचे शहराध्यक्ष तुळशिराम हजारे, तालुका उपाध्यक्ष मनोहर कुळमेथे, युवा नेते सिध्दांत बांबोळे, साहिल बोदेले, जेष्ठ नेते सुखदेव वासनिक, सिद्धार्थ गोवर्धन, नागसेन खोबरागडे अमर खंडारे, प्रेमनाथ सोनटक्के, शांतीलाल लाडे, भगवान राऊत, खेमचंद ईंदुरकर, सुनिल उराडे, भारत रायपूरे, प्रेमदास रामटेके, निलम दुधे, नामदेव दुधे, पद्मा कांबळे, वैशाली वनकर, ज्योती उराडे, लता भैसारे, योगिता सहारे, अहिल्या सहारे, संघमित्रा राजवाडे, राहुल मेश्राम आदी शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाळकरी विद्यार्थ्यांनी शिस्त आचरणात आणणे भविष्याची गरज : सपी जगताप

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे

चामोर्शी : "शाळकरी विद्यार्थ्यांना कारकिर्दीत यश संपादन करून तो टिकवायचा असेल तर अभ्यासा सोबतच शिस्त देखील तितकीच महत्त्वाची आहे आणि याचा फायदा संपूर्ण त्यांच्या जीवनात होत असतो असे प्रतिपादन मुख्य मार्गदर्शन म्हणून लाभलेले गडचिरोलीचे डीवायएसपी सुरज व्ही. जगताप यांनी युवकां पुढील आव्हाने या विषयावर बोलतांना केले. जिल्हा परिषद शाळेमधूनही विविध विभागात बरेच अधिकारी घडलेले आहेत. आणि या जी. प. महाविद्यालयातुनही बरेच यशस्वी विद्यार्थी निर्माण होतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. स्थानिक चामोर्शी शहरातील जिल्हा परिषद हाय. तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या व्यासपीठावर वार्षिक स्नेहसंमेलनाच्या बक्षीस वितरण व व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. "महाविद्यालयीन वय ही समस्त विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा सर्वोत्तम कालावधी असतो. या कालावधीत विद्यार्थी एक तर घडत असतो किंव्हा कुसंगतीच्या मार्गी लागून उर्वरित आपलं आयुष्य उतरणीला देखील लावू शकतो म्हणूनच 'सुशिक्षित सोबतच सुसंस्कारित पिढी' या देशाला अपेक्षित आहे असे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर असलेले युवा वक्ते तुषार दुधबावरे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना प्रतिपादन केले. यावेळेस मार्गदर्शक म्हणून लाभलेले सुरज मेकर्तीवार यांनी 'पॉक्सो' या कायद्यावर बोलले तसेच कायदे हे समाजाच्या परिवर्तनासाठी आणि तुमच्या- आमच्या सर्वसामान्यांच्या सुरक्षतेसाठी बनविण्यात आले असून प्रत्येका विद्यार्थ्यांनी विविध कायद्याचा आणि कर्तव्याचा पालन करावे असे कायदेविषयक जागृती या विषयावर प्रतिपादन केले. या वार्षिक स्नेहसंमेलनात उद्घाटनाच्या दिवशी ज्येष्ठ शिक्षक अविनाश तालापल्लीवार यांच्या संकल्पनेतुन चामोर्शी शहरात प्रथमच देशातील विविध राज्यांच्या संस्कृतीचे प्रतिबिंब दर्शवनाऱ्या राष्ट्रीय एकात्मता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस मंचावर मंदा वानखेडे व्यस्थापन समिती अध्यक्षा, प्रकाश गेडाम मा. सिनेट नागपूर विद्यापीठ, वाह.निरीक्षक किरण शिंदे, प्रेमा आईंचवार अध्यक्षा भौ. वी. व वि.सु. समिती, नगरसेविका चामोर्शी, सुधीर गडपायले व्य.स. सदस्य, ललिता गडपायले सदस्य, मीना गदेवार प्राचार्या हे मंचावर उपस्थित होते. सदर व्याख्यानमालेला विद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळेस विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षिका स्नेहल टिचकुले यांनी केले तर तर आभार ज्येष्ठ शिक्षक अविनाश तालापल्लीवार यांनी मानले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

गडचिरोली GOOD MORNING

## अजितदादांच्या निधनाने महाराष्ट्राचा आधारवड कोसळला ; आमदार धर्मरावबाबा आत्राम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाची बातमी समजताच त्यांचे निकटवर्तीय आणि अहेरी विधानसभा क्षेत्राचे आमदार



धर्मरावबाबा आत्राम यांना मोठा धक्का बसला आहे. आपल्या भावना व्यक्त करतांना ते अत्यंत भावूक झाले. अजितदादांच्या निधनाचे वृत्त ऐकून मला मोठा धक्का बसला आहे. आज मी माझा नेता नाही, तर माझा मोठा भाऊ आणि आधारवड गमावला आहे. अजितदादा हे केवळ एक कणखर राजकारणी नव्हते, तर ते माझ्यासारख्या आदिवासी भागातील कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे मार्गदर्शक होते. गडचिरोली जिल्ह्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि येथे रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी दादांनी नेहमीच झुकते माप दिले. जिल्ह्याला औद्योगिकदृष्ट्या प्रगत बनवण्याचे त्यांचे स्वप्न आता आम्हाला पूर्ण करायचे आहे. राज्याच्या राजकारणातील एक धाडसी, स्पष्ट वक्ता आणि वेळेचा अत्यंत पक्का असलेला जननेता आज आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती कधीही भरून काढता येणार नाही.असे दुःख व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केले आहे.

# गरिबांच्या आरोग्यावर शासनाने घातला घाला

## पालकमंत्री किंवा सहपालक मंत्री दौऱ्यात ताफा अडवणार -आजाद समाज पक्षाचा इशारा..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार, तपासण्या व नोंदणीसाठी शुल्क आकारण्याचा निर्णय हा गोर-गरीब, आदिवासी, शेतकरी, मजूर व सामान्य जनतेच्या आरोग्यावर थेट घाला आहे. गडचिरोलीसारख्या मागास व आदिवासी बहुल जिल्ह्यात हा निर्णय अधिक अन्यायकारक असून आजाद समाज पार्टी या जनविरोधी धोरणाचा तीव्र शब्दांत निषेध करत आरोग्य हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार असून शासनाने मोफत आरोग्य सेवा देणे ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र शासन आपल्या जबाबदाऱ्यांपासून पळ काढत गरीब रुग्णांकडून पैसे वसूल करण्याचा घाट घालत आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. सरकार जर कोणतीही मागणी नसतांना काही योजनांअंतर्गत हजारो कोटी रुपये खर्च करू शकते, तर सामान्य जनतेच्या आरोग्यासाठी निधी उपलब्ध का करू शकत नाही? असा थेट सवाल आजाद समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड यांनी उपस्थित केला आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण व आदिवासी रुग्ण उपचारापासून वंचित राहतील वेळेवर उपचार न मिळाल्याने गंभीर परिणाम होतील खासगी रुग्णालयांकडे जाण्याची सक्ती होईल सर्वसामान्यांवर आर्थिक बोजा वाढेल, आजाद समाज पार्टी शासनाला स्पष्ट शब्दांत इशारा देत हा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा, अन्यथा, येत्या काळात गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांना घेराव घालण्यात येईल, पालकमंत्री किंवा सहपालक मंत्री गडचिरोली दौऱ्यावर आल्यास त्यांच्या ताफ्याला शांततामय मार्गाने अडवून निषेध व्यक्त करण्यात येईल. हा लढा कोणत्याही राजकीय स्वार्थासाठी नसून सामान्य जनतेच्या आरोग्य हक्कासाठी आहे. शासन जर जनतेच्या जीवाशी खेळत असेल तर आजाद समाज पार्टी कुठल्याही परिस्थितीत शांत बसणार नाही, असा ठाम इशारा देण्यात आला आहे.



## लाहेरी शासकीय आश्रम शाळेतील तब्बल ७० विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ आणि पोटदुखीचा त्रास

### ७० विद्यार्थ्यांना विषबाधा उपचारासाठी रुग्णालयात दाखल..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली: एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेतील तब्बल ७० विद्यार्थ्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केल्याने एकच खडबड उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार मंगळवारी (२७ जानेवारी) रोजी रात्रीच्या सुमारास जेवण केल्यानंतर शासकीय आश्रम शाळा लहरी येथील एका विद्यार्थ्याला पोटदुखीचा त्रास झाला होता. २८ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास एका मागून एक असे तब्बल ७० विद्यार्थ्यांना असाच त्रास होऊ लागल्याने येथील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी येते उपचारार्थ दाखल दखल केले. ४० विद्यार्थ्यांची प्रकृती जास्त बिघडल्याने त्यांना भामरागड तालुका मुख्यालयातील ग्रामीण रुग्णालय येथे हलविण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच भामरागड येथील प्रकल्प अधिकारी अमर राऊत, तहसीलदार किशोर बागडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी रोशण चव्हाण तसेच आदी अधिकाऱ्यांनी भेट देऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या चमुला बोलावून उर्वरित विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. सध्या लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात ३० आणि भामरागड ग्रामीण रुणालयात ३८ आणि अहेरी येथील उपजिल्हा रुग्णालयात ०२ असे एकूण ७० विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहे. या आश्रम शाळेतील उर्वरित विद्यार्थी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्य निग्राणीत ठेवले असून अन्नातून विषबाधा झाली तर नाही ना? अशी शंका व्यक्त केली जात आहे. चौकशीनंतरच नेमकं प्रकार समोर येणार आहे.भामरागड प्रकल्प कार्यालय अंतर्गत येत असलेल्या लाहेरी येथील शासकीय आश्रम शाळेतील तब्बल सत्तर विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ आणि पोटदुखीचा त्रास होत असल्याने तब्बल ७० विद्यार्थ्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या लाहेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ३० विद्यार्थी आणि भामरागड तालुका मुख्यालयातील ग्रामीण रुग्णालयात ४० विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे भामरागड येथे उपचारार्थ दाखल केलेल्या चाळीस विद्यार्थ्यांपैकी ०१ विद्यार्थी आणि १० विद्यार्थिनींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालय अहेरी येथे हलविण्यात आल्याची माहिती येथील अधिकाऱ्यांनी दिली आहे.











■ विशेष म्हणजे भामरागड ग्रामीण रुग्णालयात २२ मुले आणि १८ मुली असे एकूण ४० विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असतानाच ०१ मुलगी आणि ०१ मुलगा असे ०२ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक वाटल्याने त्यांना अहेरी येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविले असल्याची माहिती सहाय्यक प्रकल्पाधिकारी रोषण चव्हाण यांनी दिली आहे.

## जनसेवेसाठी तत्पर लोकनेता, सहृदय मित्र गमावला : आ सुधीर मुनगंटीवार यांची शोकभावना

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : कै. अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अभ्यासू, अनुभवी आणि ठाम विचारांचे नेतृत्व होते. मतभेद असले तरी विचारांचा आदर राखणे, आणि राजकारणाच्या पलीकडे जाऊन माणुसकी जपणे ही त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रात एक स्पष्ट वक्ता, आणि वैयक्तिक आयुष्यात एक सहृदय मित्र आपण गमावला आहे, अशा शब्दात माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शोकभावना व्यक्त केली आहे. अजितदादांचा स्वभाव हा नेहमीच स्पष्ट आणि निर्भीड वक्तेपणाचा राहिला. जे योग्य वाटे ते त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता मांडले. सत्ता, विरोध किंवा समीकरणे यापेक्षा जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी त्यांची भूमिका अनेकदा राजकीय चर्चांना दिशा देणारी ठरली. मतभिन्नता असूनही परस्पर सन्मान राखण्याची त्यांची शैली आजच्या




राजकारणात दुर्मिळ म्हणावी अशी होती. विधानसभा असो वा सार्वजनिक व्यासपीठ त्यांचे बोलणे ठाम, मुद्देसूद आणि आशयघन असे. राजकारण हे केवळ पदांचे नव्हे, तर मूल्यांचे असते, ही जाणीव त्यांच्या वागण्यातून कायम प्रकट होत असे. त्यामुळेच सहकारी असोत वा विरोधक, सर्वांच्या मनात त्यांच्याविषयी आदराची भावना होती. विकासासाठी प्रत्येकाला मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होता. दातृत्व या शब्दातला दा हा दादा या विशेषणात दडला आहे. व्यक्तिगत पातळीवर ते एक आपुलकीचे, संवेदनशील आणि विश्वासू मित्र होते. राजकीय मतभेद कधीही वैयक्तिक नात्यांच्या आड येऊ नयेत, हा त्यांचा आग्रह होता. अनेकदा त्यांच्या स्पष्ट, प्रामाणिक शब्दांनी मार्गदर्शन लाभले; आज तेच शब्द आठवणींतून अंतःकरणाला भिडत आहेत. आज अजितदादा आपल्यात नाहीत, याची जाणीव मन सुन्न करणारी आहे. आबालवृद्धासाठी नेहमी तत्पर राहणारा त्यांचा अजितदादा, सकाळी सहा वाजता पासून जनसेवेसाठी तत्पर राहणारा हा लोकनेता आता आपल्यात नाही ही कल्पना सहन होत नाही. त्यांचा आवाज शांत झाला असला, तरी त्यांनी जपलेले मूल्य, त्यांची राजकीय भूमिका आणि माणुसकीचा वारसा कायम स्मरणात राहील. कै. अजितदादा पवार यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना व असंख्य समर्थकांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो. अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

## कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी ग्रंथभेट योजनेअंतर्गत सन 2025 या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात.

या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिद्ध होणाऱ्या शासनमान्य ग्रंथ निवड यादी मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन 2025 या कॅलेंडर वर्षात (दि.1 जानेवारी 2025 ते दि.31 डिसेंबर 2025) प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत (Complimentary copy) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि. 28 फेब्रुवारी 2026 पर्यत सादर करणे आवश्यक आहे.

28 फेब्रुवारी 2026 नंतर प्राप्त झालेल्या ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेसाठी सन 2025 या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच मुद्रण व नोंदणी अधिनियम 1867 अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम 1954 अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सर्व लेखक, प्रकाशक यांनी ग्रंथ पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालक यांनी केले आहे.

## संक्षीप्त







### पर्यावरणाचे रक्षण करून मानवी जीवन सुरक्षित करा : आमदार रामदास मसराम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : निसर्ग मानवाला खूप काही देत असतो याची जाण ठेवून, निसर्गाचं देणं आहे या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपण करून किमान एक तरी झाड लावावे, वृक्ष लागवड ही एक व्यापक चळवळ निर्माण करुण, जगा, जगवा अन् जगू दया हा जीवन मंत्र आत्मसात करुन वृक्षारोपणाची सामाजिक बांधिलकी चळवळ घरा घरात पोहोचावे असे आवाहन आमदार रामदास मसराम यांनी केले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ठाणेगाव नदी घाट मशानभुमि परीसरात कसलेली प्रकारचें झाडें नसल्यामुळे नागरीकांना मृत्यू पावलेल्याना व्यक्तीना उन्हाळ्याच्या दिवसात जाळत असताना उन्हाचे चटके आवरण्यासाठी झाडेच नसल्याने उन्हाचे चटके लागत होते यासाठी झाड प्रेमी मित्र मंडळ, ठाणेगाव' नवीन यांनी पुढाकार घेऊन आज प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आमदार रामदास मसराम यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करून व 'कंपाऊंड'चे उद्घाटन करण्यात आले.त्यावेळी मसराम बोलत होते. यावेळी आरमोरी तालुका काँग्रेस अध्यक्ष मिलिंद खोब्रागडे जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष दिलीप घोडाम धनपाल मिसार अँन्ड.राजसाहेब सुकदेवे प्रशांत खोबागडे महेंद्र कुकडकर संजय लोथे सिकंदर नदरधने गितेश उपरीकर अक्षय लोथे अशिक लोणारे गोलु लोथे आशिष दुधबळे गोलु बनकर प्रज्वल प्रधान प्रभाकर भुरसे ईशांत लट्टे निखिल बेदेवार यासह अन्य नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी लोकसभातुन विविध प्रकारचे झाडे लावून अम्पाऊन जाळी लावण्यात आले.




### कुरखेडा येथील श्रीराम विद्यालयात रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत विविध स्पर्धांतून जनजागृती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गडचिरोली यांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत कुरखेडा येथील श्रीराम विद्यालय तथा श्रीराम कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय कुरखेडा येथे रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी चित्रकला, वक्तृत्व व निबंध आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेच्या विषयाच्या माध्यमातून जनजागृती व नियमाचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी रस्त्यावरील सुरक्षा, वाहतुकीचे नियम विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आकर्षक चित्रांच्या माध्यमातून रस्ते अपघाताची कारणे व उपाय मांडले. वक्तृत्व स्पर्धेत, रस्ता अपघातात एक हात मदतीचा, 'रस्ता सुरक्षा-काळाची गरज' या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावी विचार व्यक्त केले. तो सोबतच निबंध स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले विचार निबंध च्या माध्यमातून प्रगट केले, स्पर्धेतील प्रथम द्वितीय आणि तृतीय विजेत्या स्पर्धकांना परिवहन कार्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. रस्ते सुरक्षा ही केवळ एका विभागाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून शिस्तबद्ध वाहन चालवल्यास अनेक जीव वाचवता येतात असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. सोबतच वकृत्वकलेच्या माध्यमातून विषयाला हात गवसणी घालून विद्यार्थ्यांनी उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना जनजागृती पर मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर सहायक मोटार वाहन निरीक्षण पवन येवले, मोटार वाहन निरीक्षक भागवत चोपडे, प्रा. प्रदीप पाटणकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनोद नागपूरकर नाट्य कलावंत विश्वंभर गाहणे, शिक्षक संजय शिरपूरवा, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. विनोद नागपूरकर यांनी केले. यावेळी वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी विधी भास्कर बनसोड, द्वितीय क्रमांक विष्णू लक्ष्मण गायकवाड, तृतीय क्रमांक रवीना हरिदास कुंजाम, सोबतच चित्रकला व निबंध स्पर्धा येथील प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### अजितदादा पवार यांच्या निधनाने राज्य शोकसागरात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री



अजितदादा पवार यांचे बुधवार (ता. 28) रोजी झालेल्या विमान दुर्घटनेत अपघाती निधन झाले. त्यांच्या आकस्मिक जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून राजकीय, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. राजकारणासह समाजकारणात आपल्या ठाम नेतृत्वशैलीने, प्रशासनिक कौशल्याने आणि जनतेशी असलेल्या थेट संवादामुळे अजितदादा पवार यांनी राज्याच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनामुळे राज्याने एक अनुभवी, कणखर आणि प्रभावी नेतृत्व गमावले आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व शोकसंवेदना व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सर्वपक्षीय शोकसभा गुरुवार (ता. 29) रोजी सायंकाळी 5 वाजता, गडचिरोली येथील इंदिरा गांधी चौक परिसरातील राजीव गांधी खुल्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या शोकसभेला सर्व राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष लीलाधर भरडकर यांनी केले आहे. अजितदादा पवार यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी असून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी गडचिरोलीत सर्वपक्षीय एकजूट पाहायला मिळणार आहे.

# कुरुड ग्रामपंचायत व तंमुसने घडवून आणला भव्य दिव्य गुण गौरव सोहळा

## ईतिहासात पहिल्यांदाच केला ग्रामस्थांचा गुणगौरव, कुरुड वासियांनी अनुभवला अनोखा ऐतिहासिक क्षण

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : तालुक्यातील कुरुड हे सांस्कृतिक व धार्मिक गाव असून, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी तसेच शंकरपटाच्या निमित्ताने एकाच दिवशी आठ ते दहा प्रयोगाचे आयोजन करणारे गाव म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. कुरुड गावात अनेकजण कलागुणसंपन्न तसेच विविध क्षेत्रात पारंगत आहेत. अशा गुणी लोकांच्या पावलावर पाऊल ठेवून भावी पिढीने वाटचाल करून येणाऱ्या पिढीचे आदर्श बनावे हा उद्देश समोर ठेवून, कुरुड ग्रामपंचायत व तंमुस च्या संयुक्त विद्यमाने गावात आगळा वेगळा उपक्रम राबवत ईतिहासात पहिल्यांदाच ग्रामस्थांचा गुणगौरव सोहळा यशस्वीरीत्या पार पाडल्याने, ग्रामपंचायत अधिकारी तसेच तंमुसचे पदाधिकारी ग्रामस्थांच्या वाहवाहिस पात्र ठरले आहेत आणि या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ग्रामस्थ ठरले आहेत.

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे व जि.प. शाळेच्या मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे औचित्य साधून ग्रामस्थांचा गुणगौरव सोहळा घडवून आणल्याने हा अनोखा उपक्रम गावात एकच चर्चेचा विषय ठरू लागला आहे. सरपंच प्रिती मडावी यांच्या अध्यक्षतेखाली घडवून आणलेल्या या सोहळ्यास प्रामुख्याने माजी जिल्हा परिषद सदस्य दिगांबर मेश्राम, सेवा सोसायटीचे अध्यक्ष दादाजी भर्रे, तंमुस अध्यक्ष महादेव ढोरे, माजी सरपंच मनोहर निमजे, माजी तंमुस अध्यक्ष हरिभाऊ ढोरे, माजी उपसभापती अर्चना ढोरे, उपसरपंच शंकर पारधी, सदस्य प्रविण उईके, विलास पिलारे, पल्टुदास मडावी, रेखा मडावी, प्रतिभा उके, माजी पोलीस पाटील रघुनाथ खरकाटे, ग्रामपंचायत अधिकारी दामोदर पटले, पोलीस पाटील मंगेश मडावी, तंमुस सदस्य विठ्ठल ढोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान ग्रामपंचायत व तंमुसच्या संयुक्त विद्यमाने गावात ग्रामस्थांनी आपापल्या कार्यक्षेत्रात बजावलेल्या उल्लेखनीय कामगीरीची दखल घेत संविधान फलक, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव केला.यात प्रामुख्याने गावातील शांतता व सुव्यवस्थेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल उत्कृष्ट तंटामुक्त समिती सदस्य, इयत्ता १० वी उत्तीर्ण व शैक्षणिक सानुग्रह अनुदानासाठी पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महिला सक्षमीकरण व आर्थिक प्रगतीसाठी केलेल्या कार्याबद्दल आदर्श बचतगट महिला, व्यसनावर मात करून आदर्श जीवनशैली स्वीकारल्याबद्दल व्यसनमुक्त व्यक्ती, गावाच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलणाऱ्या व्यक्तीचा तसेच कला, क्रिडा, संगीत क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळाल्याबद्दल व शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. या माध्यमातून भावी पिढी व ग्रामस्थांसमोर अनेक आव्हाने उभे करून ग्रामस्थांनी गावाच्या विकासात हातभार लावून आदर्श निर्माण करावा व गावाची अखंडता व एकात्मता कायम टिकवून ठेवण्यात मौलिक भुमिका बजवावी असा संदेश देण्यात आल्याने घडवून आणण्यात आलेला उपक्रम गावात एकच चर्चेचा विषय ठरू लागला आहे. कार्यक्रमाचे संचालन जि. प. शाळेचे शिक्षक नाकाडे यांनी, प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी दामोदर पटले यांनी तर आभार ग्रामपंचायत कर्मचारी प्रफुल्ल आठवले यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.





